स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 10–09–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 13. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 14. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 15. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 16. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 161:— नागपूर शहरातील सिमेंट कॉंक्रिट रस्ते फेज–2 ( आय.आर. आय. पी. – 2015 ) प्रकल्प राबविण्याकरिता संलग्न **परिशिष्ट – अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण 12 पॅकेजेसला मंजुरी प्रदान करण्याचा तथा पॅकेजनिहाय निविदा बोलविणे बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्या प्रमाणे एकूण 12 पॅकेजेस प्रस्तावित केले आहे. ते एकुण 24 पॅकेजेस करण्यात यावे अशी ही स्थायी समिती प्रशासनास निर्देश देते. तसेच हया पॅकेजेसला मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार अधिक्षक अभियंता यांना प्रदान करण्यात येते. तसेच निविदा अटी शर्ती स्थायी समिती समोर सादर करुन त्यास मंजूरी प्राप्त करुन घ्यावी. या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162</u>:— Providing technical assistance for Creation of a comprehensive computerized geo-enabled Property database for Nagpur Municipal Corporation (NMC) to support assessment and consolidation of all Municipal revenues या कामा करीता जाहीरातव्दारे निविदा मागविण्यात आल्या. या कामाचे दोन भाग आहेत, Item-A:- Design and Implementation of Assessment & Consolidation of Municipal revenues Application Software (including all interfaces and integrations) व Item-B:- (door to door survey work) i.e. Municipal revenue assessment and collection of information relevant to Municipal revenues and User Charges. या दोन्ही भागांचे स्वतंत्रपणे evaluation करावयाचे होते. या निविदा कामा संदर्भात खालील प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

<u>अ) निविदेतील Item A करीता :—</u>

1) या कामासाठी निविदा अटी शर्ती प्रमाणे Combined Technical व Financial Score महत्तम असलेली निविदाकार M/s Cyber Tech यांची रू. 6,75,06,753=00 किमतीची निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ब) निविदेतील Item B करीता :—</u>

1) या कामाकरीता निविदाकार मे. Cyber Tech यांनी सादर केलेल्या रू. 120/- प्रति हाऊस या निम्नतम दरास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) उपरोक्त निम्नतम दरानुसार शहरातील अंदाजित सहा लक्ष मालमतांच्या सर्वेक्षणाच्या कामावरील अपेक्षित रू. 7,20,00,000=00 च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

3) उपरोक्त निम्नतम दराप्रमाणे काम करण्यास इतर निविदाकारांपैकी फक्त M/s Ananth Tech यांनी तयारी दर्शविल्याने, M/s Cyber Tech यांना सात झोनचे तर M/s Ananth Tech यांना तीन झोनचे काम विभागुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने जो प्रस्ताव मंजूरीसाठी प्रस्तावित केला आहे, त्यामधील L1, M/s Cyber Tech यांना ते निम्नतम, निविदाकार असल्यामुळे नियमाप्रमाणे संपूर्ण 10 झोनचे सर्वेक्षणाचे काम देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

4) उपरोक्त खर्चाकरिता सन 2015—16 च्या मालमत्ता कर अर्थसंकल्पीय पद क्र. (A29000622604) GIS सर्वेक्षण व स्कॅनिंग करणे. अंतर्गत अतिरिक्त सहा कोटीची तरतुद उपलब्ध करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच या संपूर्ण कामाचा प्रगती अहवाल प्रत्येक दोन महिण्यांत स्थायी समिती समोर

सादर करणे प्रशासनास बंधनकारक राहील. या सुचनेसह विषय एकमताने मंजूर तसेच ' M/s Cyber Tech हा निविदाकार सर्वेक्षणाच्या कामात कमी पडत असेल तर प्रशासनास हे काम दुसऱ्या निविदाकाराकडुन करुन घेऊ शकेल परंतु यांस स्थायी समितीची स्वतंत्र मंजूरी घेणे आवश्यक राहील यांसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 163</u>:— स्थायी समिति म.नपा. यांचे सन 2015—16 चे अंदाजपत्रकात झोन क्र.1 लक्ष्मीनगर क्षेत्रीय कार्यालयाकरिता प्रभाग समिती पदा अंतर्गत भांडवली खर्चाकरिता रु. 520.00 लक्ष व महसूली खर्चाकरिता रु. 197.00 लक्ष अशाप्रकारे एकूण रु. 717.00 लक्ष राशीची तरतूद उपलब्ध केलेली आहे. त्यानुसार भांडवली तथा महसूली खर्चाची आवश्यकतेप्रमाणे प्रभागनिहाय राशी मा. नगरसेवक हयांनी सुचविल्यानुसार करण्यात आलेली तरतूद वितरीत करुन सोबत संलग्न आहे. कार्यात्मक समुहामध्ये केलेला अंतर्गत फेरबदल परिशिष्ट ''अ'' व ''ब'' मध्ये नमूद असून मूळ व सुधारित तरतूद ही मा. स्थायी समितीचे अंदाजपत्रका प्रमाणेच आहे.

करीता लक्ष्मीनगर झोन क्र. 1 मधील भांडवली तथा महसूली खर्चाचे तरतूदीचे सोबत संलग्न परिशिष्ट ''अ'' व ''ब'' प्रमाणे प्रभागनिहाय आवंटनास प्रभाग समितीचा ठराव क्र. 04 दिनांक 04.08.2015 नुसार मंजुरी प्राप्त असून सदर प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. A42305170754 या पदांचे करण्यात आलेले पुनर्विनियोजन वगळुन इतर पदाच्या पुनर्विनियोजनास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 164</u>:— प्रभाग क्र. 54— ब येथील अभ्यंकरनगर व माधवनगर येथे रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 26,80,901/— (अक्षरी सव्वीस लक्ष अंशी हजार नऊशे एक फक्त)प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 165</u>:— अ) प्रभाग क्र. 33 मधील रिंग रोड ते नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमना समोरील रस्ता सिमेंट कॉक्रीट द्वारे बांधकाम करण्यास्तव रू. 1541.90 लक्ष चे ढोबळ प्राकलनास व मा. पालकमंत्री यांनी दिनांक 20.04.2015 च्या सभेत दिलेल्या निर्देशा प्रमाणे खालील वित्तीय नियोजनास स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच,

| | | |
|---|---|---|
| 1. | मनपाचा सहभाग 45 टक्के — | रू. 693.855 लक्ष |
| 2. | नासुप्रचा सहभाग 30 टक्के — | रू. 462.570 लक्ष |
| 3. | नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचा सहभाग 25 टक्के — | रू. 385.475 लक्ष |

ब) या प्रकल्पा करीता मनपा मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. मोनार्च सर्वेअर व इंजीनियरींग कंन्सल्टंट यांची स्थायी समिती ठराव क्र. १७ दिनांक १८.०५.२००९ अन्वये मंजूर दराने नियुक्ती करण्यास स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 166</u>:— नागपूर शहरातील प्रमुख रस्ते, हायमास्टस्, मास्टस्, मैदाने (विशिष्ट) यावरील पथदिवे वगळता उर्वरित पथदिव्यांची सहा महिन्यांच्या कालावधीकरिता देखभाल दुरुस्ती करण्याकरिता रु. 6,78,71,318/— च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा व सदर कामाकरीता 7 दिवसांची मुदत देऊन निविदा बोलविण्यस मंजुरी प्रदान करण्याचा तसेच सदर कामास्तव महासभेपुढे दिनांक 21.08.2015 ला ठराव पत्रिकेवरील ठरावाच्या अनुषंगाने महासभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर सदर कामात अंतर्भूत पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलण्याच्या कामाच्या निविदा बोलावून असे कंत्राट देण्याच्या परिसिथ्तीत सदर प्रस्तावित काम तात्काळ बंद करण्याच्या अटीसी मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 167</u>:— केन्द्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत होणाऱ्या राष्ट्रीय शहर स्पर्धेत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार नागपूर शहराचा प्रस्ताव तयार करण्याकरीता मदत करण्याच्या कामाकरीता निविदेद्वारे शासन मान्यताप्राप्त सल्लागारामार्फत प्रस्ताव मागीतले असता M/s CRISIL Risk and Infrastructure Solution Limited in Association with PriMove Infrastructure Development Consultants Pvt. LTD. And Probity Soft Pvt. Ltd. यांचा Combined Technical & Financial Score महत्तम आढळलेला असल्याने निविदा निकषांनुसार त्यांची या कामाकरीता सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास व त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे याकरीता येणाऱ्या रू. 85,48,860/— च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 168</u>:— अर्थसंकल्प 2015—16 आसीनगर झोन क्र. 9 करीता प्राप्त रू. 744.50 लक्ष सहपत्र 'अ' प्रमाणे प्राप्त आहेत.

प्रभाग समिती आसीनगर झोन क्र. 9 यांनी आर्थिक वर्ष 2015—16 मंजूर केलेले सहपत्र 'अ' मंजूर करण्याचा पद क्र. A42345170754 या पदांचे करण्यात आलेले पुनर्विनियोजन वगळुन इतर पदाच्या पुनर्विनियोजनास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 169** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर